# परळीत 'विनोद'च झाला,कोण कसा कोट्याधीश झाला?

## पगार दीड दमडीची ;उत्पन्न–प्रॉपर्टी जुळेना ... वाचा पुढील अंकात

### साई संस्थानच्या तीन कर्मचाऱ्यांवर प्राणघातक हल्ला दोघांचा मृत्यु

नगर (सरकार): शिर्डीमध्ये आज एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. साई संस्थानच्या तीन कर्मचाऱ्यांवर वेगवेगळ्या ठिकाणी अज्ञातांकडून चाकू हल्ला करण्यात आला आहे. यात दोन कर्मचाऱ्यांचा मृत्यु झाला असून तिसऱ्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. वरिष्ठ पोलिस अधिकारी घटनास्थळी पोहोचले असून तपास सुरु आहे.मिळालेल्या माहितीनुसार पहाटे हे कर्मचारी शहरातील वेगवेगळ्या भागांतून कामावर निघाले होते त्यावेळी अज्ञातांनी हा हल्ला केला. यात दोघे ठार झाले. तर तिसरा कर्मचारी गंभीर जखमी झाला. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत.


सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक–आदोडे साहस

Evening Daily beedsarkar


### शरद पवार गटाचा बडा नेता अजितदादा गटाच्या वाटेवर!

मुंबई (सरकार): विधानसभा निवडणुका झाल्यापासून ठाकरे गटाला चांगलीच गळती लागली आहे. उद्धव ठाकरे यांच्या गटाचे अनेक पदाधिकारी, नेत्यांनी त्यांनी सोडचिठ्ठी देत शिंदे गटात प्रवेश केला आहे. ठाकरे गटातील ही पडझड सुरू असतानाच आता शरद पवार गटातही पडझड होण्याची शक्यता दिसत आहे. अजितदादा यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी याबाबतचे संकेतच दिले आहेत. चांद्यापासून बांद्यापर्यंत आता आमच्या पक्षात इनकमिंग सुरू झाल्याचंही तटकरे यांनी सांगितलं. तसेच एक बडा नेताही आमच्या पक्षात येणार असल्याचं सुनील तटकरे यांनी स्पष्ट केलं.


बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक १४९ वा ■ सोमवार ३ फेब्रुवारी २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 149 ■ Monday 3 February 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027




## महाराष्ट्रातील ७० लाख मतदारांची माहिती जाहीर करा; राहुल गांधी संसदेत गरजले

नवी दिल्ली (वृत्तसंस्था): विधानसभा निवडणुकीत अचानक ७० लाख नव्या मतदारांनी मतदान करून महाराष्ट्राचे सत्ताकरण केंद्र बदलले, असा आरोप करत अनेक ठिकाणी तक्रारीही झाल्या. मात्र आज देशाचे सर्वोच्च मंदिर असलेल्या संसद भवनात महाराष्ट्रातील ७० लाख मतदारांची माहिती जाहीर करा असे खा.राहुल गांधी यांनी गंभीर आरोप करत गरजले.

लोकसभा निवडणुकीत मोदी सरकारला मोदी सरकार हे नाव घेण्यासाठी पाहीजे तेवढे संख्याबळ दिले नाही. शेवटी केंद्रात एनडीए सरकार अस्तित्वात आले आणि मोदी सरकार हे तो मुमकीन है असे म्हणणारे पुन्हा शांत झाले आणि त्यानंतर महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर सत्ता परिवर्तन होईल असे वाटत होते. मात्र अचानक सत्तर लाख नवीन मतदारांनी राज्यातील सत्ताकेंद्र बदलत भाजपाला एकहाती सत्ता देण्यास यशस्वी ठरले. मात्र यावर विरोधी पक्षनेत्यांनी वी अनेक संकटांनी आक्षेप नोंदवत व्हीएम मशीवर आक्षेप घेतला. निवडणूक आयोगाकडे तक्रारही केल्या. मात्र यावर काही निर्णय झाला नाही. अचानक महाराष्ट्रात ७० लाख मतदार विविध मतदार संघात आले कोठून ? असा प्रश्न उपस्थित केला होता. मात्र त्या गोष्टीला बराच कालावधी उलटल्यानंतर आज पुन्हा एकदा देशाच्या सर्वोच्च मंदिरात विरोधी पक्षनेते खा.राहुल गांधी यांनी एनडीए सरकारचे वाभाडे काढत महाराष्ट्रात ७० लाख मतदारांची माहिती जाहीर करा, अशी गर्जना करताच संसद भवनात शांतता पसरली. त्यामुळे आता या गंभीर आरोपानंतर त्याचे पडसाद काय उमटतात याकडे संपूर्ण महाराष्ट्रासह देशाचे लक्ष लागले आहे.

# बीडमधून महिला चोरांची टोळी जेरबंद

### राहुरी पोलिसांची कामगिरी आरोपींना पोलिस कोठडी

अहिल्यानगर (सरकार): जिल्ह्यातील राहुरी येथील एका कार्यक्रमात महिला चोरट्यांनी धुमाकूळ घातला. याप्रकरणी एका महिला भक्ताने राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविला. त्याचा तपास करताना राहुरी पोलिसांनी बीड येथे जाऊन महिला चोरांच्या चार जणींच्या टोळीला ताब्यात घेतले. राहुरी न्यायालयाने चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

केशर जाधव (वय ५०, रा. गांधीनगर, बीड), गवळण गायकवाड (वय ४०, रा. माऊलीनगर, बीड), पूजा वाघमारे (वय २५, रा. खोकरमोह, ता. शिरूर जि. बीड), पूजा मोहिते (वय २७, रा. नेवासा फाटा) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

राहुरी येथे शुक्रवारी एका कार्यक्रमाला महिलांची संख्या लक्षणीय होती. गर्दीचा फायदा घेऊन महिला चोरांची टोळी सक्रिय झाली. यावेळी सुनेच्या अंगावरील सोन्याचे दागिने महिलांनी जबरदस्तीने हिसकावून जबरी चोरी केल्याचा गुन्हा एका महिला भक्ताने नोंदविला. पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलिसांनी गोपनीय माहितीच्या तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे वेगवान तपास केला.

पोलिस उपनिरीक्षक चारुदत्त खोंडे ,ज्योती डोके सहायक फौजदार तुळशीराम गिते, पोलिस हवालदार सूरज गायकवाड, राहुल यादव, प्रमोद ढाकणे, सचिन ताजणे, सतीश कुऱ्हाडे, अंकुश भोसले, नदीम शेख, जालिंदर साखरे, वृषाली कुसळकर, अशोक शिंदे, विकास साळवे, आजिनाथ पाखरे, जयदीप बडे यांच्या पथकाने बीड येथे जाऊन अवघ्या २४ तासांच्या आत शनिवारी आरोपींना ताब्यात घेतले.आरोपींना राहुरी न्यायालयासमोर उभे केल्यावर सरकारी वकील सविता गांधले–ठाणगे यांनी आरोपी टोळीने कार्यक्रमात आणखी चोऱ्या केल्या आहेत. या तपासासाठी पोलिस कोठडीची मागणी केली. न्यायालयाने चारही महिला आरोपींना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

## ५ फेब्रुवारीला मुख्यमंत्री आष्टी तालुक्यातील खुंटेफळ आणि मायंबा येथे भेट देणार

आष्टी (सरकार): दि.५ फेब्रुवारी २०२५ रोजी खुंटेफळ साठवण तलाव थेट पाईपलाईन कामाची पाहणी आणि श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव येथील समाधी मंदिराचे गाभारा बांधकामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या निमित्ताने महाराष्ट्र विधान परिषदेचे नवनियुक्त सभापती ना.प्रा.राम शिंदे आणि जागतिक खो–खो स्पर्धेमध्ये जगज्ञेतेपद मिळवलेल्या भारतीय संघातील सहभागी असलेल्या महाराष्ट्र राज्यातील महिला व पुरुष संघातील खेळाडूंचे आणि त्यांच्या प्रशिक्षकांचे भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या खुंटेफळ साठवण तलावाच्या थेट पाईपलाईन कामाची पाहणी आणि श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव येथील समाधी गाभारा भूमिपूजन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते होणार असून याच कार्यक्रमाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे सभापती पदी निवड झालेले प्राध्यापक राम शिंदे यांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे . विधान परिषद हे वरिष्ठ सभागृह असून या सभागृहाचे सभापती पदी आपल्या परिसरातील लोकप्रतिनिधीची निवड झाली आहे याचा आनंद म्हणून या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. खुंटेफळ साठवण तलाव येथे शिंपोरा तालुका कर्जत येथून उजनी धरणाचे पाणी थेट पाईपलाईन द्वारे येणार असून या पाईपलाईन कामाची पाहणी आणि संपूर्ण भारत देशातून





दरवर्षी भाविक भक्त मोठ्या प्रमाणावर दर्शनासाठी येत असतात . असे प्रसिद्ध क्षेत्र असलेले श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ समाधीस्थळ असलेले मायंबा येथील समाधी मंदिराचे गाभाऱ्याचे नव्याने बांधकाम होणार असून या बांधकामाचे भूमिपूजन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे हस्ते होत असून या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे नवनियुक्त सभापती प्राध्यापक राम शिंदे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे सह अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून यानिमित्ताने प्राध्यापक नामदार राम शिंदे यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे . खुंटेफळ साठवण तलाव हा आपला ड्रीम प्रोजेक्ट असून आष्टी आणि पाटोदा तालुक्यातील काही भागातील शेतकऱ्यांना शेती सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी मराठवाड्याच्या हक्काचे ५.६८ टीएमसी पाण्यापैकी सध्या १.६८ टीएमसी मंजूर असून या प्रकल्पाद्वारे २८ हजार हेक्टर सिंचन होणार असल्यामुळे संपूर्ण आष्टी तालुक्याचे लक्ष या प्रकल्पाकडे लागून आहे. दि.५ फेब्रुवारी २०२५ रोजी होणाऱ्या या कार्यक्रम स्थळाची पाहणी आमदार सुरेश धस यांनी केली असून त्यांचे संपूर्ण कार्यकर्ते या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कामाला लागल्याचे दिसून येत आहे सुमारे एक लक्ष जनसमुदाय या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावा यासाठी जय्यत तयारी सुरू आहे.

## जिल्ह्यात १८३ शस्त्र परवाने रद्द

### शस्त्र परवाना असणाऱ्यांच्या घरी पोलिसांच्या चकरा

बीड (सरकार): मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर दहशत, सत्ता, पैसा आणि बीडच्या वाळू माफिया आणि राखेचं भयानक वास्तव समोर आलं. हे वास्तव समोर आल्यानंतर खळबळ उडाली आहे.पवनचक्की प्रकरणाप्रमाणेच बीडमध्ये बंदुकीचा धाक दाखवणाऱ्यांच्या संख्येत कमी नाही. गेल्या काही दिवसांपूर्वी हवेत गोळीबार करणाऱ्यांच्या वायरल व्हिडीओने मोठी खळबळ माजली होती. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर प्रशासन सतर्क झाला आहे. बीड जिल्ह्यात १८३ शस्त्र परवानगी रद्द करण्यात आली आहे.

१२७ शस्त्र आणखी रद्द होणार आहेत. यामध्ये ८ जणांनी स्वतः सरेंडर होत आपली शस्त्रे जमा केली आहेत. सत्ता श्रीमंती आणि वर्चस्व दाखवण्याची हाऊस जपणाऱ्या बीडच्या शस्त्र परवानाधारकांवर मोठी कारवाई करण्यात आली आहे.संतोष देशमुख हत्या प्रकरणाला दोन महिने उलटून गेल्यानंतर पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे .घाऊकपणे दिल्या जाणाऱ्या शस्त्र परवानांच्या तपासणीसाठी आता पावलं उचलली जात आहे. बीड जिल्ह्यात



नोंदणीकृत १२८१ शस्त्र परवाने आहेत. यात ३१० प्रस्ताव रद्द करण्यासाठी पाठवण्यात आले असून यावर कारवाई करत आत्तापर्यंत १८३ शस्त्र रद्द करण्यात आले आहेत. १२७ शस्त्र रद्द होणार असल्याचा सांगण्यात आलंय. यात मृत असताना हे शस्त्र परवाना नावावर असणाऱ्यांची संख्या ११८ एवढी आहे. ही आत्तापर्यंतची सर्वात मोठी कारवाई असल्याचं सांगितलं जात आहे.

विशेष म्हणजे जिल्ह्यात ज्यांच्याकडे शस्त्र परवाना आहे, त्यांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले असून पोलीस कर्मचारी घरी जाऊन परवानाधारक शस्त्र हाताळण्यास सक्षम आहे का ? जिवंत आहे का ? याची खात्री करत आहेत. यात अनेक जण मृत असल्याचे समोर आले आहे. मृत असतानाही शस्त्र परवाना नावावर असणाऱ्यांचा आकडा ११८ असल्याचे समजते .त्यामुळे आता हे सर्व शस्त्र परवाने रद्द केले जाणार आहेत.विशेष म्हणजे जिल्ह्यात ज्यांच्याकडे शस्त्र परवाना आहे, त्यांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले असून पोलीस कर्मचारी घरी जाऊन परवानाधारक शस्त्र हाताळण्यास सक्षम आहे का ? जिवंत आहे का ? याची खात्री करत आहेत. यात अनेक जण मृत असल्याचे समोर आले आहे. मृत असतानाही शस्त्र परवाना नावावर असणाऱ्यांचा आकडा ११८ असल्याचे समजते .त्यामुळे आता हे सर्व शस्त्र परवाने रद्द केले जाणार आहेत.

## उद्या पुन्हा अंजली दमानिया बीड प्रकरणी गौप्यस्फोट करणार

बीड सरपंच सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याच्याशी संबंध असल्याच्या मुद्द्यावरून सध्या धनंजय मुंडे चर्चेत आहेत. विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. तर दुसरीकडे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी थेट अजित पवारांकडे मुंडेंविरोधात काही पुरावे दिलेत. मात्र त्यानंतरही कारवाई होत नसल्याचं पाहून आता अंजली दमानियांनी मंगळवारी आणखी मोठे गुपिते जगासमोर आणणार असल्याचा इशारा दिला आहे.



अंजली दमानियांनी सोशल मीडियावर आज सकाळी केलेल्या पोस्टमध्ये उद्या म्हणजेच मंगळवारी सकाळी ११ वाजता पत्रकार परिषद घेऊन मोठा गौप्यस्फोट करणार असल्याचे म्हटले आहे. या पोस्टमध्ये त्यांनी मंगळवारी सकाळी ११ वाजता माझ्या घरून पत्रकार परिषद घेणार आहे. हे भ्रष्टाचाराचे पुरावे पाहून मंत्रिपदाचा राजीनामा मिळेल, अशी अपेक्षा. गेले चार दिवस मी त्याच्यावर काम केलं आहे, असे म्हटले आहे. त्यानंतर एका वृत्तवाहिनीशी बोलताना अंजली दमानियांनी सविस्तर भूमिका मांडली आहे. आता हाती आलेले सगळे पुरावे अतिशय धक्कादायक आहेत. हे पुरावे जेव्हा जनतेसमोर येतील, तेव्हा मोठा निर्णय घ्यायला जनताच त्यांना भाग पाडेल, असे अंजली दमानिया म्हणाल्या आहेत.

दरम्यान, धनंजय मुंडे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मित्र असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचा उल्लेख अंजली दमानियांनी केला. सगळ्यांवरच खूप मोठा दबाव आहे. मी हे प्रकरण का लावून धरतेय? कारण जोपर्यंत धनंजय मुंडेंचा राजीनामा होत नाही, तोपर्यंत देशमुख कुटुंबाला न्याय मिळेल असं मला वाटत नाही. इतकं मोठं हत्याकांड महाराष्ट्रात झालंय. त्यात न्याय झाला नाही. का? धनंजय मुंडे देवेंद्र फडणवीस व अजित पवारांचे जवळचे मित्र म्हणून कारवाई होत नसेल, तर या दोघांनाही माझा निरोप आहे की तुम्ही अशा वेळी मैत्री निभवायची नसते, असे अंजली दमानिया म्हणाल्या.

उद्या मी पत्रकार परिषदेत मोठा धडधडीत खुलासा करणार आहे. त्यानंतर मला वाटत नाही की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा अजित पवार हे धनंजय मुंडेंची पाठराखण करू शकतील. ही कागदपत्रं जाहीर झाल्यानंतर मी भगवानगडावर कदाचित स्वत: जाऊन नामदेव शास्त्रींना ते दाखवणार आहे. त्यानंतर भगवानगडानं तरी त्यांचा राजीनामा घ्यावा, अशी विनंती मी त्यांना करणार आहे, असा उल्लेख दमानियांनी यावेळी केला.

## लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या 'या'महिलांवर होणार कारवाई?

मुंबई (सरकार): महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सोशल मिडीयावर पोस्ट करत लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या अपात्र लाभार्थ्यांवर कारवाई होणार असल्याचे संकेत दिले आहेत. लाडकी बहीण योजने अंतर्गत महिन्याला पात्र महिलांना १५०० रूपये देण्यात येत आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सरसकट सर्व महिलांना लाभ देण्यात आला.

मात्र निवडणूक झाल्यानंतर महायुती सरकारने कारवाई करण्याची तयारी सुरू केली आहे. लाडकी बहीण योजनेतील अर्जदारांच्या कागदपत्रांची फेरतपासणी सुरू असून निकष पूर्ण न करणाऱ्या आणि बनावट कागदपत्रं सादर करणाऱ्या लाडक्या बहिणींवर कारवाईचा बडगा उगारण्यात येत आहे.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत बनावट लाभार्थ्यांची नोंदणी करण्याचा गैरप्रकार हा स्थानिक अंगणवाडी सेविकांच्या सजगतेमुळे अर्ज पडताळणीच्या वेळी सप्टेंबर महिन्यातच निदर्शनास आला आहे. याबाबत ४ ऑक्टोबर रोजी पोलिसांत रीतसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे योजनेचा लाभ घेणाऱ्या लाडक्या बहिणींवर गुन्हा दाखल करण्यात येत असल्याचे महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले. सोशल मीडियावर पोस्ट करत आदिती तटकरे यांनी ही माहिती दिली आहे.

## एसटीची नवी सेवा लवकरच सुरू होणार?; परिवहन मंत्र्यांकडून संकेत

मुंबई (सरकार): कर्नाटक राज्य परिवहन सेवेची लांब पल्ल्याची 'प्रतिष्ठित सेवा' अतिशय लोकप्रिय असून आदरातिथ्य व्यवस्थापनाचा उत्कृष्ट नमुना असलेल्या या सेवेला प्रवाशांची चांगली पसंती आहे. अशाच प्रकारचा प्रयोग महाराष्ट्रात देखील करणे शक्य आहे, असं राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटलं आहे. कर्नाटक दौऱ्यावर असताना बंगळुरू येथील कर्नाटक राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मुख्यालयाच्या भेटी दरम्यान ते बोलत होते.

मंत्री प्रताप सरनाईक यांनी बंगळुरु येथे कर्नाटक राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मुख्यालयाला भेट दिली. त्यावेळी त्यांच्यासोबत कर्नाटक राज्याचे परिवहन मंत्री डॉ. रामलिंगा रेड्डी यांच्यासह राज्याचे परिवहन सचिव डॉ. एन. व्ही. प्रसाद व कर्नाटक राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष रिझवान नवाब तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, नितीन मैद (महाव्यवस्थापक वाहतूक) व नंदकुमार कोलारकर (महाव्यवस्थापक यंत्र ) हे अधिकारी उपस्थित होते.

या वेळी मंत्री सरनाईक यांनी कर्नाटक राज्य परिवहन सेवेद्वारे चालवल्या जाणाऱ्या अंबारी, ऐरावत, राजहंस यासारख्या प्रीमियम सेवेच्या बसेस बरोबर इतर बसेसची पहाणी केली. तसेच या बसेस कशा पद्धतीने चालवल्या जातात याची माहिती घेतली. आदरातिथ्य व्यवस्थापनाचा उत्कृष्ट नमुना असलेल्या या बस सेवेला प्रवाशांची चांगली पसंती आहे. खाजगी बसेसच्या तुलनेमध्ये सुरक्षित आणि वेळेवर सेवा देण्यासाठी या बस सेवा अतिशय प्रसिद्ध आहे.

## संपादकीय

# दिल्लीत आप विरूद्ध भाजपा

दिल्ली विधानसभेचा निवडणूक प्रचार शिगेला पोहोचला आहे. अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाला दिल्लीची सत्ता कायम राखायची आहे, तर केंद्रात सत्तेची हॅटट्रिक संपादन करणाऱ्या भाजपाला दिल्लीचे तख्त खेचून घ्यायचे आहे. दिल्लीच्या निवडणुकीत काँग्रेसची अवस्था दयनीय आहे. यापूर्वी सलग पंधरा वर्षे दिल्लीवर राज्य करणाऱ्या काँग्रेस पक्षाला यावर्षी तरी दिल्ली विधानसभेत खाते उघडायला मिळणार का हा लाखमोलाचा प्रश्न आहे.

गेल्या वर्षभरात केजरीवाल व त्यांचे सरकारमधील सहकारी किती भ्रष्ट आहेत हे भाजपाने दिल्लीकर जनतेपुढे मांडले. केजरीवाल यांच्यासह तिघा मंत्र्यांनाही जेलमध्ये काही दिवस काढावे लागले. त्यामुळे गेली बारा वर्षे केजरीवाल यांची असलेली लोकप्रियता या निवडणुकीत कायम आहे की घसरणीला लागली आहे, याचा कस या निवडणुकीत लागणार आहे. शेकडो कोटींच्या भ्रष्टाचारांच्या गंभीर आरोपांमुळे व मद्य विक्रीच्या धोरणात सरकारचे कोट्यवधी रुपये नुकसान झाल्याचा ठपका ठेवला गेल्याने यावेळी आम आदमी पक्षाला फटका बसू शकतो. भाजपाची १९९३ ते १९९८ या काळात दिल्लीवर सत्ता होती. अगोदर मदनलाल खुराणा, नंतर साहिबसिंग वर्मा आणि शेवटी काही महिने सुषमा स्वराज असे पाच वर्षांत तीन मुख्यमंत्री भाजपने दिल्लीला दिले. नंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचे सर्वच्या सर्व सातही खासदार दिल्लीकरांनी अनेकदा निवडून दिले, पण गेल्या २६ वर्षांत भाजपला दिल्ली विधानसभेची सत्ता मिळवता आली नाही. दिल्लीकरांनी काँग्रेस पंधरा वर्षे व नंतरची अकरा वर्षे आम आदमी पक्ष यांच्यावर विश्वास दाखवला. यंदाच्या निवडणुकीत दिल्लीत मोदींची जादू चालेल का हाच कळीचा मुद्दा आहे. भाजपा किंवा काँग्रेस या दोन्ही पक्षांकडे दिल्लीत सर्वमान्य नेता नाही. आम आदमी पक्षाकडे केजरीवाल आणि त्यांची फौज आहे. भाजपाकडे कार्यकर्ते आहेत पण दिल्लीत चेहरा नाही. दिल्लीत काँग्रेसची संघटना विस्कळीत आहे आणि स्थानिक नेतृत्व नाही. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे चेहरे घेऊनच भाजपा व काँग्रेसला दिल्ली विधानसभा निवडणुकीत उतरावे लागत आहे.

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी दि. ५ फेब्रुवारीला मतदान आहे आणि ८ फेब्रुवारीला मतमोजणी आहे. नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातून आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक व माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे लढत आहेत व त्यांच्याविरोधात माजी मुख्यमंत्री साहिबसिंग वर्मा यांचे पुत्र प्रवेश हे भाजपाच्या तिकिटावर, तर माजी मुख्यमंत्री शीला दीक्षित यांचे पुत्र संदीप हे काँग्रेसचे उमेदवार म्हणून मैदानात उतरले आहेत. फिर लाएंगे केजरीवाल, हे आपचे निवडणूक प्रचार गीत असून प्रत्येक मतदारसंघात ऐकवले जात आहे. दिल्लीत पुन्हा सत्ता आली, तर दिल्लीतील महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याचा इरादा आपने बोलून दाखवला आहे, तर भाजपाने आपवर भ्रष्टाचारी सरकार म्हणून जोरदार हल्ला चालू ठेवला आहे. दिल्लीला स्वच्छ पाणीपुरवठा, दर्जेदार आरोग्य सेवा, सार्वजनिक बस सेवेचा बोजवारा, हवा प्रदूषण अशा सर्वच बाबतीत आप सरकार अपयशी ठरल्याचा भाजपाने प्रचार चालवला आहे. आपली व्होट बँक उभारण्यासाठी बांगलादेश व म्यानमारमधून आलेल्या अवैध घुसखोरांना आप मदत करीत असल्याचा आरोपही भाजपाने केला आहे.

काँग्रेसने दिल्ली शहर अध्यक्ष देवेंद्र यादव व महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा अलका लांबा यांनाही दिल्लीच्या मैदानात उमेदवार म्हणून उतरवले आहे. दिल्लीत आपण सत्तेवर आलो तर दिल्लीतील महिलांना दरमहा २५०० रुपये देण्याचे आश्वासन काँग्रेसने दिले आहे. आप आणि काँग्रेसमधून आलेल्या हायप्रोफाइल नेत्यांनाही या निवडणुकीत भाजपाने उमेदवारी दिली आहे. दिल्ली काँग्रेसचे माजी अध्यक्ष अरविंद सिंह लवली, तसेच आपचे माजी मंत्री राजकुमार चौहान, कैलाश गेहलोट, राजकुमार आनंद हे भाजपाच्या तिकिटावर लढत आहेत. दिल्ली विधानसभेची निवडणूक आप व भाजपाच्या दृष्टीने प्रतिष्ठेची आहे तसेच तीनही प्रमुख राजकीय पक्षांनी मतदारांना आकर्षित करण्यासाठी रेवड्यांची उधळण केल्याने निवडणूक चुरशीची व रोचक बनली आहे. केजरीवाल यांनी मुख्यमंत्री झाल्यावर आरोग्य सेवा, शालेय शिक्षण यावर भर दिला आणि सार्वजनिक बस प्रवासात मोफतची सवलत दिली. सरकारी शाळा खासगी शाळांसारख्या आधुनिक व दर्जेदार बनवल्या. सरकारी इस्पितळात विश्वसनीय सेवा व सुधारणा केल्या. सेवांचा दर्जा व सुधारणा या आधारावरच दिल्लीकर मतदारांनी केजरीवाल यांच्या पक्षाला दोन वेळा प्रचंड बहुमत देऊन विधानसभेत सत्ता दिली. केजरीवाल यांच्या मोफत रेवड्याची टिंगल भाजपाने भरपूर केली पण त्याचे अनुकरण मध्य प्रदेशने केले. तत्कालीन मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी महिलांसाठी लाडकी लक्ष्मी योजना सुरू केली. भाजपाला लक्ष्मी योजनेने विधानसभा जिंकून दिलीच शिवाय या राज्यातून भाजपाचे २९ खासदार लोकसभा निवडणुकीत विजयी झाले. नंतर झारखंड, महाराष्ट्रातही महिलांसाठी मोफत योजनांच्या घोषणा झाल्या. 'लाडकी बहीण' किंवा 'लक्ष्मी योजना' राबवताना उमेदवाराला किंवा राजकीय पक्षांना कोणताच खर्च येत नाही. सरकारी खजिन्यातूनच महिलांच्या बँक खात्यात थेट पैसे जमा होतात. महिलांना पैसे मिळतात आणि त्यांची मते रेवड्या वाटणाऱ्या पक्षाला मिळतात. दिल्लीतील विधानसभा निवडणूकही रेवड्यांच्या घोषणांवरच लढवली जात आहे.

दिल्लीत १९५२ मध्ये राज्य विधानसभा निर्माण झाली, तेव्हा ४८ जागा होत्या. पहिल्या निवडणुकीत काँग्रेसने ३६ जागांवर विजय मिळवला. तेव्हा चौधरी ब्रह्मप्रकाश दिल्लीचे पहिले मुख्यमंत्री झाले. १९५५ मध्ये काँग्रेसने गुरमुख निहाल सिंग यांनी मुख्यमंत्रीपदावर बसवले. ते जेमतेम वर्षभर होते. नंतर राज्य पुनर्गठन आयोगाच्या शिफारसीनुसार दिल्ली विधानसभा बरखास्त झाली आणि १९६६ मध्ये मेट्रोपोलिटीन कौन्सिलची स्थापना झाली. संविधानात दुरुस्ती करून १९९२ मध्ये दिल्ली विधानसभा अस्तित्वात आली. १९९३ मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपाला मोठे बहुमत मिळाले. पण पाच वर्षांत तीन मुख्यमंत्री बदलण्याची पाळी भाजपावर आली. घोटाळ्यात नाव आल्याने मदनलाल खुराणा यांना मुख्यमंत्रीपद सोडावे लागले, मग साहिबसिंग वर्मा आले पण भडकलेल्या महागाईने त्यांना ते पद सोडावे लागले. सुषमा स्वराज यांना पक्षाने मुख्यमंत्रीपदाच्या आसनावर बसवले पण जेमतेम ५२ दिवस त्यांना मिळाले. १९९८ ची दिल्ली विधानसभा निवडणूक सुषमा स्वराज विरुद्ध शीला दीक्षित अशी झाली. त्यात शीला दीक्षितांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस विजयी झाली. तेव्हा ६० रुपये किलो झालेल्या कांद्याने भाजपाला सत्ता गमवावी लागली. १९९८ तो २०१३ अशा तीन वेळा सलग दिल्लीत काँग्रेसचे सरकार आले. २०११ मध्ये दिल्लीत लोकपाल विधेयकाच्या मागणीसाठी अण्णा हजारे यांनी आंदोलन केले व त्यातून अरविंद केजरीवाल, किरण बेदी यांच्या नेतृत्वाचा उदय झाला. नंतर स्थापन झालेल्या आम आदमी पक्षातून संजय सिंह, आतिशी, मनीष सिसोदिया, असे अनेक नवे चेहरे दिल्लीत नेते म्हणून पुढे आले. आम आदमी पक्षाने २०१३ मध्ये दिल्ली विधानसभेची निवडणूक लढवली आणि पंधरा वर्षे सत्तेवर असलेल्या काँग्रेसचा पराभव केला. त्या निवडणुकीत भाजपाने ७० पैकी ३२ जागा जिंकल्या पण भाजपाला बहुमत मिळाले नाही. आपने २८ जागा जिंकल्या. काँग्रेसच्या सात आमदारांनी आपला समर्थन दिले व केजरीवाल पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले. राजकारणात शह- मातचा खेळ नेहमीच चालू असतो. काँग्रेसने पाठिंबा काढून घेतल्याने ४९ दिवसांत केजरीवाल सरकार कोसळले. सन २०१५ मध्ये झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचे ७० पैकी ६७ जागांवर आमदार निवडून आले. दिल्लीने एकमुखाने केजरीवाल यांना पाठिंबा दिला. तेव्हा भाजपाला केवळ तीन जागा मिळाल्या व काँग्रेसचा एकही आमदार निवडून आला नाही. सन २०२० मध्ये आपचे ६२ आमदार निवडून आले व पुन्हा केजरीवाल मुख्यमंत्री झाले. काँग्रेसला दुसऱ्यांदा भोपळा फोडता आला नाही. घोटाळे व भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली केजरीवाल यांना जेलमध्ये जावे लागल्याने आतिशी यांच्यावर पक्षाने मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी सोपवली. आतिशी या भले मुख्यमंत्री असल्या तरी पक्षाचे सर्वेसर्वा सुप्रीम नेते हे केजरीवालच आहेत. आधुनिक सरकारी शाळा, मोहल्ला क्लिनिक, महिलांना मोफत बस प्रवास, २०० युनिटपर्यंत वीज मोफत, २० हजार लिटर पाणी मोफत, ज्येष्ठांना मोफत तीर्थयात्रा अशा घोषणा राबवत केजरीवाल यांनी दिल्लीतील सत्ता मिळवली. आता तर लाडकी बहीण योजनेची जादू फिरवली आहे. रेवड्यांच्या शर्यतीत भाजपा व काँग्रेसही सामील झाली आहे, स्थानिक प्रश्नांवर चर्चा करण्यात कोणालाच रस नाही.

# महाकुंभतील दुर्घटना



उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे घडलेल्या दुर्घटनेमुळे महाकुंभमेळ्याला गालबोट लागले. महाकुंभमेळ्यासाठी देशाच्या कानकोपऱ्यांतून तसेच विदेशातूनही भाविक पवित्र स्नानासाठी येत आहेत. भाविकांची ही संख्या हजारोंच्या नाही तर लाखोंच्या नाही तर करोडोंच्या घरात असल्याने प्रशासकीय यंत्रणेवर ताण निर्माण होणे स्वाभाविक आहे. प्रयागराज येथे महाकुंभ मेळ्यात सहभागी होणाऱ्या करोडो भाविकांची संख्या पाहता उत्तर प्रदेश सरकारच्या नियोजनाची खरोखरीच प्रशंसा करावी तितकी कमीच आहे. महाकुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्या भाविकांनीदेखील चेंगराचेंगरी होणार नाही, दुर्घटना घडणार नाही, याबाबत सतर्कता बाळगणे आवश्यक होते. देश-विदेशातील कोट्यवधी भाविकांचे प्रयागराज भूमीवर कोणत्याही आवाहनाशिवाय किंवा निमंत्रण न देता ज्या कारणाने आगमन होते, ते निमित्त म्हणजे महाकुंभमेळा.

पद्मपुराणानुसार कुंभोत्सवाच्या दिव्य संगमाच्या वेळी प्रयागराजमध्ये स्नान करणाऱ्या भाविकांना जन्म-मृत्यूच्या बंधनातून मुक्ती मिळते, म्हणून या पवित्र ठिकाणी जाऊन स्नान, दर्शन आणि दान केल्याने भाविकांना पुण्य लाभ होतो. कुंभ राशीची गणना तीन प्रमुख ग्रहांच्या आधारे केली जाते. कालचक्रमध्ये ग्रहांचा राजा, सूर्य, राणी चंद्र आणि ग्रहांचा गुरू याला महत्त्वाचे स्थान आहे. या तीन ग्रहांचे विशिष्ट राशींमध्ये होणारे संक्रमण हा कुंभ उत्सवाचा मुख्य आधार असतो. प्रयागराजमध्ये, गुरू वृषभ राशीत आणि सूर्य मकर राशीत असल्याने, माघ महिन्यातील अमावस्येच्या दिवशी चंद्राचा मकर राशीत प्रवेश हा अत्यंत दुर्मीळ योगायोग निर्माण करतो. महाकुंभमेळ्यात मौनी अमावस्येला अनन्यसाधारण महत्त्व असते. या मौनी अमावस्येला महाकुंभमेळ्यात स्नान करण्यासाठी देशविदेशातील कोट्यवधी भाविक सहभागी झाले होते. त्यातच चेंगराचेंगरी झाली. ३० हून अधिक भाविकांचा मृत्यू झाला, शंभराहून अधिक भाविक जखमी झाले आहेत. हा प्रशासकीय आकडा असला तरी यात वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मृतांच्या वारसांना उत्तर प्रदेश सरकारकडून ५० लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे. ही दुर्घटना घडल्यावर उत्तर प्रदेश सरकारने ज्या प्रकारे पावले उचलली, प्रशासकीय यंत्रणा राबविली, परिस्थितीवर नियंत्रण मिळविले, या सर्व घटना खरोखरीच प्रशंसनीय आहेत. मुळात कुंभमेळ्यात सहभागी कोट्यवधी भाविकांची संख्या, त्यात झालेली चेंगराचेंगरी, त्यातून निर्माण झालेली परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी योगी सरकारने राबवलेली पोलिसी यंत्रणा व जखमींवरील उपचारासाठी आरोग्य व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी राबविलेली यंत्रणा, जखमींना रुग्णालयापर्यंत विनाविलंब पोहोचविण्यासाठी काही मिनिटांमध्ये निर्माण केलेले स्वतंत्र कॉरिडॉर या एखाद्या चित्रपटातील कथानकाला साजेसे दृश्य योगी सरकारने वास्तवात साकारले.उत्तर प्रदेशचे पोलीस, आरोग्य यंत्रणा, रस्ते व्यवस्था सांभाळणारे वाहतूक पोलीस आणि या सर्वांवर संचलन करणारे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी तसेच या सर्वांचा वेळोवेळी आढावा घेऊन मार्गदर्शन करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे महाकुंभ मेळ्यातील दुर्घटनेनंतर परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी उपाययोजनेतील खरे 'देवदूत' ठरले आहेत, असे म्हणणेदेखील अतिशयोक्तीचे ठरणार नाही. महाकुंभमधील चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेनंतर पंतप्रधान मोदी सातत्याने मुख्यमंत्री योगी यांच्या संपर्कात होते. जखमींच्या उपचाराबाबत माहिती जाणून घेत होते. दिवसभरातील व्यस्त कार्यबाहुल्यातूनही त्यांनी उत्तर प्रदेशातील घडामोडींवर पूर्णपणे लक्ष केंद्रित केले होते. रवी, चंद्र व गुरू हे गोचरमध्ये विशिष्ट पद्धतीने योग जुळून येतो त्या त्या योगावर त्या ठिकाणी कुंभमेळा भरतो. कधी सहा वर्षे, तर कधी बारा वर्षे, तर कधी १४४ वर्षांनी हे योग येत असतात. आता जर असा योग सहा वर्षांनी आला तर त्यास अर्धकुंभ मेळा म्हणतात. जर असा योग बारा वर्षांनी आला तर तो पूर्ण कुंभ म्हटला जातो आणि असा योग जर १४४ वर्षांनी आला तर तो महाकुंभ मेळा म्हटला जातो. जानेवारी २०२५ मध्ये उत्तर प्रदेशच्या प्रयागराजच्या भूमीवर सुरू असलेला महाकुंभमेळा हा देखील १४४ वर्षांनीच आला असल्याने देशविदेशातील कोट्यवधी भाविकांचे या ठिकाणी आगमन झाले होते. भाविकांच्या स्नानासाठी उत्तर प्रदेश सरकारने प्रयागराज परिसरात असंख्य कुंडांची निर्मिती केली होती. बुधवारी मौनी अमावस्येला अमृतस्नानापूर्वी गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या संगमावर पवित्र स्नान करण्यासाठी दिवसभर मोठ्या प्रमाणात जनसमुदाय त्रिवेणी संगम परिसराकडे जात असल्याने ही दुःखद घटना घडली. ही चेंगराचेंगरी प्रयागराजमधील संगम घाटाजवळ घडली. संगम घाट हे नाव या ठिकाणाच्या आकारामुळे पडले आहे. हे संगम घाट प्रयागराजमध्ये स्नानासाठी सर्वात महत्त्वाचे स्थान मानले जाते. असे म्हणतात की येथेच यमुना आणि सरस्वती नदी गंगेला मिळते. या ठिकाणी बहुतेक साधू-मुनी स्नान करतात. भाविकही या ठिकाणी स्नानाला सर्वाधिक महत्त्व देतात. उत्तर प्रदेश सरकारने भाविकांच्या स्नानासाठी शेकडोंच्या संख्येने घाट बनविले असतानाही संगम घाटावरच स्नान करण्याचा भाविकांचा मोह या दुर्घटनेस प्रामुख्याने कारणीभूत ठरला आहे. भाविकांना मौनी अमावस्येच्या दिनी स्नानासाठी प्रत्येक कुंभमेळ्यात वाढत चाललेली लाखोंच्या संख्येने वाढत जाणारी भाविकांची संख्या पाहता संगम घाटाचे क्षेत्र देखील प्रत्येकवेळी वाढवले जाते. २०१९ च्या तुलनेत यावेळी गर्दी पाहता संगम घाटाच्या परिसरात वाढ करण्यात आली. याआधी येथे दर तासाला ५० हजार लोक स्नान करू शकतील अशी व्यवस्था करण्यात आली होती. मात्र यावेळी महाकुंभात दर तासाला २ लाख लोकांनी स्नान करण्याची तयारी केली आहे. महाकुंभ मेळ्यात घडलेल्या दुर्घटनेमुळे जगाचे लक्ष या प्रयागराजवर केंद्रित झाले आहे.

घटना घडल्यावर घटनेची समीक्षा करण्यासाठी अनेकजण आकलन करत असले तरी घटना घडल्यानंतर घटना सावरण्यासाठी, परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी उत्तर प्रदेशने राबविलेल्या उपाययोजनांची सर्वत्र प्रशंसा केली जात आहे. घटनेचे पडसाद देशाच्या कानकोपऱ्यांत उमटले असले तरी या घटनेमुळे महाकुंभमध्ये सहभागी होणाऱ्या भाविकांच्या उत्साहावर फारसा परिणाम झाला नसल्याचे दिसून येत आहे. महाकुंभसाठी स्नानादरम्यान कोणत्याही प्रकारची बाधा निर्माण होऊ नये म्हणून पाण्याच्या अंतर्गत भागातही विशेष प्रकारची उपाययोजना उत्तर प्रदेश सरकारने राबविली होती. दुर्घटना क्षणिक काळात होते; परंतु दुर्घटना घडूच नये यासाठी आयोजकांना एक-सव्वा वर्ष नियोजनाची तयारी करावी लागते. कोट्यवधींचा सहभाग असलेल्या ठिकाणी कधीही काहीही होण्याची भीती असते. नेमकी चेंगराचेंगरी झाल्याने महाकुंभवर दुर्घटनेचे सावट निर्माण झाले. आयोजन ही सरकारची जबाबदारी असली तरी दुर्घटना घडू नये ही सहभागी होणाऱ्या भाविकांचीही जबाबदारी असते, हे विसरून चालणार नाही.

# पंढरपुरात रंगला विठ्ठल रुक्मिणी मातेचा विवाह

**पंढरपूर (प्रतिनिधी):** दरवर्षी वसंत पंचमीच्या मुहूर्तावर पंढरपुरात विठ्ठल रुक्मिणीचा विवाह सोहळा पार पडतो. त्याप्रमाणे वसंत पंचमीमिनित्त आज विठ्ठल रुक्मिणी मातेचा सोहळा पार पडला आहे. आज सकाळी १० ते १२ वाजेच्या सुमारास लाखो भक्तांच्या हजेरीत हा सोहळा पार पडला.



विवाह सोहळ्यासाठी बंगळूरहून विठ्ठल रुक्मिणीसाठी विशेष पोशाख शिवण्यात आला होता. विवाह सोहळयापूर्वी सकाळी काकड आरतीदरम्यान विठ्ठलाला पांढऱ्या रंगाचे वस्त्र परिधान करण्यात आले असून सोन्याच्या मुकुटाऐवजी पांढरे पागोटे घालण्यात आले होते. भजन कीर्तन करत महिलांनी फेर धरला असून फुगड्या घालत मंदिर परिसर जल्लोष आणि गजबजला होता.

**मंदिरात फुलांची सजावट**

विठ्ठल रुक्मिणी मातेचा विवाह सोहळ्यानिमित्त संपूर्ण मंदिराला विविध प्रकारच्या रंगबिरंगी फुलांनी सजविण्यात आले आहे. गुलाब, रेड गुलाब, पांढरा गुलाब, पिंक गुलाब, पिवळा गुलाब, जिप्सी, डिजी, सुर्यफुल, जरबरा, तगर, गुलछडी, कामिनी, शेवंती, पासली, काडी, गिलाडो, तुक्स, गोंडा (लाल पिवळा) बिजली, अस्टर इत्यादी फुलांचा वापर करण्यात आला आहे. तसेच सुमारे साडेतीन ते चार टन फुल् आणि १ टन ऊसाचा वापर करण्यात आला आहे.

# हत्ती आले आणि लाखो रुपयांच्या शेतीची वाट लावून गेले

**सिंधुदुर्ग (प्रतिनिधी):** केर गावात सकाळी पाच हत्तींच्या कळपाने धुडगूस घातला. शेतकरी चंद्रकांत देसाई यांच्या मालकीच्या केळी सुपारी आदी सह अन्य झाडांची मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. केर गावातच हत्तींनी ठाण मांडले असल्याने ऐन हंगामात काजू बाग बहरत असताना शेती बागायती फिरणे मुश्किल झाले आहे.आसपास जंगलात जाणेही शक्य होत नाही त्यामुळें जळणासाठी लागणारे सरण (लाकडे) कसे आणावे असा प्रश्न उपस्थित झाला आहे. ना पिक, ना उत्पन्न, अशी अवस्था शेतकरी वर्गाची झाली आहे.

जीवापाड मेहनत करून वाढविलेली बागायती पिके हत्तींनी उध्वस्त करून लाखो रुपयांची नुकसानी केली आहे. ग्रामीण भागातील उदरनिर्वाह हा काजू,आंबा, सुपारी नारळ,केळी आदींवर अवलंबून असतो. मात्र तेच उत्पन्न हातातोंडाशी आले असताना घास हिरावून घेतला जात आहे. या संकटावर



# अमेरिका सुपरपॉवर;जगातील शक्तिशाली देशांची नवी यादी जाहीर!

**नवी दिल्ली (वृत्तसेवा):** जगातील शक्तिशाली देशांची क्रमवारी जारी करण्यात आली आहे. शक्तिशाली देशांची क्रमावारी ही विविध घटकांवर आधारित आहे. जानेवारी २०२५ पर्यंत या घटकांचा आढावा घेण्यात आला आहे. युएस न्यूजद्वारे तयार करण्यात आलेल्या जगातील शक्तिशाली देशांच्या क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर अमेरिकेने स्थान मिळवले असून त्यानंतर चीन, रशिया अन्य देशांना स्थान मिळाले आहे. धक्कादायक म्हणजे भारताला पहिल्या १० क्रमांकामध्ये स्थान मिळाले नाही.त्रैीलशीळपवळर.ले नुसार युएस न्यूजने २०२५ मधील जगातील १९५ देशांपैकी १० सर्वात शक्तिशाली देशांची क्रमवारी ही अनेक घटकांचा विचार करुन देण्यात आली आहे.

क्रमवारी या पाच विशिष्ट घटकांवर आधारित आहे. यामध्ये नेतृत्व, आर्थिक परिणाम, राजकीय प्रभाव, आंतरराष्ट्रीय संबंध, एक शक्तिशाली सैन्य. २०२५ मध्ये जगातील टॉप १० शक्तिशाली देश-अमेरिका-३०.३४ ट्रिलियन डॉलर्स (जीडीपी) ३४.५ कोटी (लोकसंख्या), चीन - १९.५३ ट्रिलियन डॉलर्स (जीडीपी), १४१.९ कोटी (लोकसंख्या), रशिया - २.२ ट्रिलियन डॉलर्स (जीडीपी), १४.४




कोटी (लोकसंख्या) युनायटेड किंग्डम - ३.७३ ट्रिलियन डॉलर्स (जीडीपी), ६.९१ कोटी (लोकसंख्या), जर्मनी - ४.९२ ट्रिलियन डॉलर्स (जीडीपी), ८.४५ कोटी (लोकसंख्या), दक्षिण कोरिया - १.९५ ट्रिलियन डॉलर्स (जीडीपी), ५.१७ कोटी (लोकसंख्या), फ्रान्स - ३.२८ ट्रिलियन डॉलर्स (जीडीपी), ६.६५ कोटी (लोकसंख्या), जपान - ४.३९ ट्रिलियन डॉलर्स (जीडीपी), १२.३७ कोटी (लोकसंख्या), सौदी अरेबिया - १.१४ ट्रिलियन डॉलर्स (जीडीपी), ३.३९ कोटी (लोकसंख्या), इस्रायल - ५५०.९१ अब्ज डॉलर्स (जीडीपी),९३.८ लाख (लोकसंख्या)

**भारत कोणत्या क्रमांकावर?**

जानेवारी २०२५ पर्यंत भारत सर्वात शक्तिशाली देशांच्या यादीत १२ व्या क्रमांकावर आहे. तर, जागतिक स्तरावर जीडीपीचा विचार केल्यास अमेरिका, चीन, जर्मनी आणि जपान नंतर भारत पाचव्या क्रमांकावर आहे.

# अभिनेत्यांना पुरस्कार मिळतो, पण आमच्या वाट्याला...

**पुणे (प्रतिनिधी):-** तुमच्या मनात आलं असेल की मी या ठिकाणी कसा? हा शासनाचा कार्यक्रम आहे. पण मला उदय सामंत यांनी या कार्यक्रमासाठी बोलावलं. त्यामुळे मला तुमचं सर्वांचं दर्शन झालं. त्यासाठी मी उदय सामंत यांचे आभार मानतो. माझे मित्र अभिनेता रितेश देशमुख यांना माझ्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. हे सर्व भाग्यवान माणसं, मी पुरस्कार दिला म्हणून नाही. पण यांना (अभिनेत्यांना) पुरस्कार मिळतात आणि आमच्या वाट्याला फक्त तिरस्कार असतो. तिरस्कार घेऊन



आम्हाला पुढे वाटचाल करावी लागते. मराठी भाषेसाठी आपल्याला खूप गोष्टी कराव्या लागतील. सयाजी शिंदे यांनी आता सांगितलं की त्यांनी आफ्रिकेतील व्यक्तीशी मराठीत कसं भांडण केलं. आपण आपल्या भाषेवर नेहमी ठाम राहिलं पाहिजे. कारण जग तुम्हाला त्यानंतरच दाद देतं, असं राज ठाकरे यांनी म्हटलं.

पुण्यात तिसरे विश्व मराठी संमेलन आज पार पडले. हे विश्व मराठी संमेलन मराठी भाषा विभागाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. आज या संमेलनाच्या समारोपाच्या कार्यक्रमात मनसे अध्यक्ष राज ठाकरे, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्यासह आदी दिग्गज उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना राज ठाकरे यांनी मराठी भाषेसह विविध विषयांवर भाष्य केलं. राज्य सरकारने आणि आम्ही-तुम्ही सर्वांनी आपली मराठी भाषा टिकवली पाहिजे, असं आवाहनही राज ठाकरे यांनी केलं. याच कार्यक्रमात राज ठाकरे यांनी एक विधान केलं. 'अभिनेत्यांना पुरस्कार मिळतो, पण आमच्या वाट्याला फक्त तिरस्कार असतो', असं म्हणत राज ठाकरे यांनी तुफान फटकेबाजी केली.

दुसऱ्या देशातील माणसं हे आपल्या देशाशी आणि भाषेशी खूप प्रामाणिक असतात. मग त्यांचा अभिमान आपल्यालाही वाटायला लागतो की ते त्यांच्या भाषेशी किती प्रामाणिक आहेत. आपल्या देशात सुद्धा स्वत:च्या भाषेशी प्रामाणिक आहेत. आपल्या देशातील दुसरे राज्य जर त्यांच्या भाषेबाबत एवढा अभिमान बाळगून असतील तर आपण दुसऱ्या भाषेत का बोलतो?

## विश्व मराठी समेलनात राज ठाकरेंची तुफान फटकेबाजी

एकमेकांना भेटल्यानंतर दुसऱ्या भाषेत कशासाठी बोलतो? आता कार्यक्रमात आपल्याकडे राज्यगीत लागलं होतं. जय जय महाराष्ट्र माझा.., मग भारतातील दुसऱ्या राज्यात कोणत्या राज्याचं राज्यगीत आहे?, असंही राज ठाकरे म्हणाले.

ज्या हिंद प्रांतावर १२५ वर्ष कोणी राज्य केलं असेल तर ते फक्त मराठ्यांनी केलं. ज्यांनी १२५ वर्ष राज्य केलं, त्या राज्याची जी भाषा आहे ती भाषा आपण जपायची नाही तर कोणी जपायची? आता कार्यक्रमाच्या आधी उदय सामंत यांनी मला सांगितलं की मराठी भाषेसाठी तुम्ही जे सांगतान त्यासाठी आम्ही मदत करू. ते मदत करतील अशी अपेक्षा आहे. मराठी भाषेसाठी जे-जे आम्ही करू त्यासाठीही ते पाठिंबा देतील अशी देखील अपेक्षा आहे. पण तेव्हा आमच्यावर गुन्हे दाखल करू नका. आतापर्यंत आलेला अनुभव आहे. कारण आम्ही जे करत आहोत ते मराठी भाषेसाठी आणि महाराष्ट्रासाठीच करत आहोत, असंही राज ठाकरे यांनी म्हटलं.

सोमवार दिनांक ०३ फेब्रुवारी २०२५

बीड सरकार

पान 3

# पत्रकारांच्या प्रश्नासाठी पुन्हा रस्त्यावर उतरणार- एस.एम.देशमुख

## सेलू येथे आदर्श जिल्हा, तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा व अध्यक्षांचा मेळावा उत्साहात





**सेलु (प्रतिनिधी):–** पत्रकारांच्या प्रश्नासाठी मराठी पत्रकार परिषदेने सातत्याने पाठपुरावा केला. पत्रकारांच्या संरक्षणासाठी कायदा व्हावा, यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलने केली. अखेर सरकारने २०१७ मध्ये पत्रकार संरक्षण कायदा केला. पण प्रत्यक्षात या कायद्याची अंमलबजावणी होत नाही. कारण या कायद्याचे नोटिफिकेशन निघाले नाही. पत्रकार संरक्षण कायद्यासह सरकार पत्रकारांच्या इतर प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा मराठी पत्रकार परिषद राज्यभर रस्त्यावर उतरून पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी आंदोलन करणार आहे,' असा इशाराच परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी दिला.

मराठी पत्रकार परिषद आयोजित रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा व अध्यक्षांचा मेळावा परभणी जिल्ह्यातील सेलू येथे एस.एम.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला. यावेळी देशमुख बोलत होते. याप्रसंगी परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, प्रमुख वक्ते तथा प्रसिद्ध निवेदक विशाल परदेशी, स्वागताध्यक्ष विनोद बोराडे, परिषदेचे कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूर शेख, राज्य प्रसिद्धीप्रमुख संदीप कुलकर्णी, सह प्रसिद्धीप्रमुख भरत निगडे, महिला आघाडी अध्यक्षा शोभाताई जयपूरकर, डिझिटल मीडिया प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, परिषदेचे उपाध्यक्ष प्रकाश कांबळे,उपाध्यक्ष गणेश मोकाशे विभागीय सचिव रवी उबाळे, सचिन शिवशेट्टे, अशोक काकडे, उप विभागीय अधिकारी संगीता सानप, माजी नगराध्यक्ष हेमंत आढळकर, परिषदेचे परभणी जिल्हाध्यक्ष प्रभू दिपके, परभणी जिल्हा सरचिटणीस मोहम्मद इलियास, बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा समन्वयक अभिमान्यु घरत,जील्हा प्रसिध्दी प्रमुख संजय हांगे, तालुका सरचिटणीस प्रचंड सोळंके, यासह वडवणी, केज, अंबाजोगाई, गेवराई, धारुर, माजलगाव आदी तालुक्यासह सेलू तालुका पत्रकार संघ अध्यक्ष लक्ष्मण बागुल यांच्यासह राज्याच्या विविध भागातून आलेले पत्रकार उपस्थित होते.

'राज्य सरकारने पत्रकारांसाठी पेन्शन योजना सुरू केली. आरोग्य योजना सुरू केल्या. पण प्रत्यक्षात या योजनांचा लाभ घेताना अनेक अडचणी येत आहेत,' असे सांगतानाच देशमुख म्हणाले, 'समाजाच्या पत्रकारांकडून १०० अपेक्षा करतात. पण अडचणीच्या वेळात समाजाने देखील पत्रकारांच्या पाठीशी उभे राहावे, अशी अपेक्षा असते. मात्र पत्रकाराच्या अडचणीच्या काळात कोणी उभे राहत नाही. पण यापुढे महाराष्ट्रातील एकही पत्रकार एकाकी पडणार नाही, यासाठी मराठी पत्रकार परिषद काम करीत आहे. तशी रचनाच आपल्या संघटनेची आहे. मराठी पत्रकार परिषद ग्रामीण भागात पुरस्कार वितरण सारखे उपक्रम घेण्यामागे मोठा उद्देश आहे. कारण ग्रामीण जीवन, संस्कृती, प्रश्न यासर्वाची जाण पत्रकारांना होणे महत्त्वाचे आहे. राज्यातील ३५६ तालुक्यात आपल्या परिषदेचे अस्तित्व आहे. सामाजिक बांधीलकी जपत परिषद काम करीत आहे. पण ग्रामीण भागातील पत्रकारांचे प्रश्न तितक्याच ताकतीने मानण्याचे काम आता करणे गरजेचे असून याबाबत लवकरच परिषद भूमिका जाहीर करेल,' असेही देशमुख यांनी सांगितले.देशमुख पुढे म्हणाले, 'पत्रकार अधिस्वीकृतीचे नियम ग्रामीण भागातील पत्रकारांसाठी खूप कडक आहे. याबाबतीत विचार करण्याची वेळ आली आहे. त्यामुळेच पत्रकारांच्या हक्काची चळवळ पुढे नेण्यासाठी आगामी काळात अधिक व्यापकतेने, जोमाने परिषद काम करेल,' असेही देशमुख यांनी स्पष्ट केले.

### पत्रकारांचा कार्यगौरव

**पत्रकारिता क्षेत्रांमध्ये विशेष योगदान देणाऱ्या पत्रकारांचा सेलू येथील कार्यक्रमांमध्ये गौरव करण्यात आला. यामध्ये आसारामजी लोमटे (साहित्यिक तथा ज्येष्ठ पत्रकार), डी व्ही मुळे (ज्येष्ठ पत्रकार), कांचनजी कोरडे (ज्येष्ठ पत्रकार) यांचा गौरव केला गेला. तर, सेलू येथील तरुणी शेख अलिना शेख मुनीर हिची इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये निवड झाल्याबद्दल तिचा सन्मान करण्यात आला.**

### असे आहेत पुरस्कार प्राप्त पत्रकार संघ

**मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात येणारा स्व. वसंतराव काणे आदर्श पत्रकार संघ जिल्हा पुरस्कार अकोला जिल्हा पत्रकार संघाला देण्यात आला. तर आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार कणकवली तालुका पत्रकार संघ (कोल्हापूर विभाग), बुटीबोरी तालुका पत्रकार संघ (नागपूर विभाग), सेलू तालुका मराठी पत्रकार संघ (छत्रपती संभाजीनगर विभाग), पिंपरी चिंचवड तालुका पत्रकार संघ (पुणे विभाग), शहादा तालुका पत्रकार संघ (नाशिक विभाग), उमरगा तालुका पत्रकार संघ ( लातूर विभाग), खामगाव प्रेस क्लब (अमरावती विभाग), चिपळूण तालुका पत्रकार संघ (कोकण विभाग) यांना देण्यात आला.**

**पत्रकारिता क्षेत्रात काम करताना माणसे जोडा**

याप्रसंगी उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे विशाल परदेशी यांनी पत्रकारिता क्षेत्रात काम करताना माणसे जोडा,' असा मोलाचा सल्ला देत सांगितले की, 'आजच्या कार्यक्रमाला उत्तर महाराष्ट्र, कोकण, मध्य महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा अशा विविध भागातून पत्रकार आलेत. मराठी पत्रकार परिषद या मातृसंस्थेच्या एक भाग आहे, याचा मला अभिमान आहे. ग्रामीण भागातील पत्रकाराकडे जेवढी माहिती असते, तेवढी शहरी भागातील पत्रकारांना नसते. चांगला फिल्ड रिपोर्टर हा उत्तम अँकर होऊ शकतो. बेधडकपणे व्यक्त होण्यास प्राधान्य द्या. असे बोला जे तुमच्या आईला समजेल, असे प्रश्न विचारा जे तुमच्या आईला समजतील. आयुष्यात आपल्याला जमिनीवर आणणारी माणसे असावीत. तरच माणूस माणसात जाऊन उत्तम मिसळू शकेल. पत्रकारिता क्षेत्रात प्रत्येक क्षण स्पर्धेसारखा असतो, आणि या स्पर्धेत आपण टिकणे गरजेचे आहे. पण आपण कोणतीही बातमी देताना शब्दांचे भान फार महत्त्वाचे आहे. घरातील महिला जेव्हा घर सांभाळते, तेव्हाच पत्रकारीतेचे व्यसन पूर्ण होऊ शकते. तसेच पत्रकारिता करताना आरोग्य जपणे महत्त्वाचे आहे. ब्रेकिंग न्यूज मिळवण्याच्या नादात नाही ते धाडस ते करू नका. धाडस कोणत्या गोष्टीचे करावे, हे देखील समजून घेणे गरजेचे आहे. स्वतः ला जपा, कुटुंबाला जपा.कारण आपले कुटुंब आहे तरच आपण आहोत,' असेही परदेशी यांनी सांगितले.

मिलिंद अष्टीवकर म्हणाले की,'मराठी पत्रकार परिषद १०० वर्षाकडे वाटचाल करीत आहे. पत्रकारांसाठी ग्रामीण भागात कार्यक्रम घेतल्याने तेथील पत्रकारांना एक बळ मिळते. राज्यभरातून आलेल्या पत्रकारांचे स्वागत याप्रसंगी स्वागताध्यक्ष विनोद बोराडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परभणी जिल्हा सरचिटणीस मोहम्मद इलियास यांनी तर सूत्रसंचालन सुभाष मोहकरे यांनी केले. आभार रेवणआप्पा साळेगावकर यांनी मानले.

## इस्कॉनच्यावतीने भगवद्गीता प्रज्ञाशोध परीक्षेचे बक्षीस, प्रमाणपत्राचे वितरण



**बीड (प्रतिनिधी):–** भगवद्गीता हे भारतीय संस्कृती आहे ती शालेय व विद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी या हेतूने आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृतसंघ इस्कॉन बीड श्री श्री राधागोविंद मंदिर यांच्यावतीने डिसेंबर महिन्यात भव्य भगवद्गीता प्रज्ञाशोध परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला असून त्याचे बक्षीस वितरण १ फेब्रुवारी रोजी इस्कॉन भगवत गीता प्रज्ञाशोध परीक्षेचे अध्यक्ष कृष्णनाम प्रभू, निवृत्त मंडलाधिकारी श्रीमान मथुरामंडळ प्रभुजी, अमृत गोविंद प्रभू, रोहिणीपुत्र बलराम प्रभू व श्री हनुमान ज्वेलर्सचे प्रोप्रा. हेमंत रुद्रवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या परीक्षेमध्ये एकूण ९२५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. एकूण अठरा हजार रुपये तसेच सन्मानचिन्ह यांचे वाटप करण्यात आले. आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ ही एक शुद्ध आध्यात्मिक शैक्षणिक तसेच सांस्कृतिक संस्था आहे. ही संस्था स्वामी प्रभुपाद यांनी १९६६ साली अमेरिका येथे स्थापन केली. या संस्थेत त्या निमित्ताने संपूर्ण जगामध्ये श्रीमद्भागवत, श्रीमद् भगवद्गीता यांच्या आधारे प्रचार करणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. त्याचबरोबर बालक व तरुण यांच्यापर्यंत भारताचा आध्यात्मिक वारसा प्राचीन संस्कृती व नीतिमूल्य पोहोचविण्याचे कार्य ही संस्था करत आहे. या कार्यासाठी इस्कॉनमध्ये अनेक स्तरातून आलेले उच्च पदवीधर कुशाग्र बुद्धी मान प्राप्त असे स्वयंसेवक सेवाभावी वृत्तीने कार्य करीत आहे. शालेयस्तरीय बक्षिसांचे वाटप व आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. अशी माहिती भगवत गीता प्रज्ञाशोध परीक्षा प्रमुख श्रीमान कृष्ण नामदास यांनी दिली.

## वाळू व्यवसाय करणाऱ्या २६ जणांवर प्रतिबंधक कारवाई

### एसपी काँवत यांच्या वाळू व्यावसायिकांना सूचना

**बीड (प्रतिनिधी):–** शहर व जिल्ह्यात विविध ठिकाणी वाळुचा व्यवसाय करणाऱ्या ५१ लोकांना जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी अवैध 'वाळू वाहतूक न करण्याबात सक्त सूचना दिल्या. तसेच २६ जणांवर अभिलेख पाहणी करुन प्रतिबंधक कारवाई केली.

या संदर्भात पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी शनिवारी (दि. २) जिल्ह्यातील अवैध वाळु उपसा करुन चोरटी विक्री करणारे अभिलेखावरील ५१ लोकांना पोलीस अधीक्षक कार्यालयात बोलावून त्यांना योग्य मार्गदर्शन केले. तसेच कोणीही यापुढे अवैधरित्या वाळुची तस्करी, चोरटी वाहतूक करणार नाही, तसे आढळुन आल्यास त्यांचे विरुध्द हद्दपार एमपीडीए मोक्का कायद्यातंर्गत कारवाई केली जाईल याबाबत सूचना दिल्या. यातील २६ इसमांविरुध्द अभिलेख पाहणी करुन प्रतिबंधक कारवाई केली असून आता या २६ इसमांनी बाँडचे उल्लंघन केल्यास त्यांचे बाँन्डची रक्कम शासन जमा करण्याची कारवाई केली जाईल याबाबत सक्त सूचना यावेळी एसपींनी दिल्या.

## मजूर दाम्पत्यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत द्यावी: पवार

**वडवणी (प्रतिनिधी):–** ऊस तोडणीचे काम करून गावी परतताना ट्रॅक्टर पलटी होऊन वारोळा तांड्यातील पती-पत्नी जागीच ठार झाल्याची घटना करंजी घाटात घडली. त्यांच्या नातेवाईकांना शासनाने आर्थिक मदत करावी अशी मागणी सेवालाल सेना अध्यक्ष बी.एम. पवार यांनी निवेदनाव्दारे केली आहे.

या संदर्भात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माजलगाव तालुक्यातील वारोळा तांडा येथील बंजारा समाज बांधव सोलापूर जिल्ह्यातील लोकनेते सहकारी साखर कारखाना येथे काम करून परत येत असताना करंजी घाटात ट्रॅक्टर पलटी झाला. या अपघातात अनिल पिराजी राठोड (२७) आरती अनिल राठोड (२५) हे पती पत्नी जागीच ठार झाले. त्यांची लहान मुले निराधार झाली आहेत. अशा स्थितीत मयतांच्या नातेवाईकांना राज्य शासनाने ५० लाख रुपयांची आर्थिक मदत तात्काळ करावी अशी मागणी पवार यांनी केली आहे.

## स्मार्ट कॉटन प्रकल्पात महाराष्ट्रात प्रथमच बनवल्या कापसाच्या गाठी

### हरितक्रांती शेतकरी गट आहेर वाहेगाव यांचे कौतूक



**बीड (प्रतिनिधी):–** हरितक्रांती शेतकरी गट आहेर वाहेगाव यांनी स्मार्ट कॉटन प्रकल्पात महाराष्ट्रातून बनवल्या प्रथम कापसाच्या गाठी. गेवराई तालुक्यातील आहेर वाहेगाव येथील हरितक्रांती शेतकरी गटामार्फत या हंगामात महाराष्ट्रामधून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी तथा प्रकल्प संचालक आत्मा सुभाष साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथम कापसाच्या गाठी तयार केल्या. त्या विक्री केल्या जाणार आहेत. या गटाने पिकवलेला कापूस हा बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत कापसाच्या गाठी बनवल्या असून त्या महाकॉटन मार्फत ऑनलाईन विक्री केल्या जाणार आहेत.

आहेर वाहेगावमधील शेतकऱ्यांनी या प्रकल्पात सहभाग घेऊन त्यांनी पिकवलेला एकूण ७३२ किंटल कापूस राजे शिवछत्रपती जिनिंग गेवराई फॅक्टरीत पाठवून त्याच्या १५९ गाठी बनवलेल्या आहेत. एका गाठीमध्ये साधारणपणे १६५ ते १७० किलो रुई राहते, एक क्विंटल कापसातून ३३ ते ३९ किलो पर्यंत रुईचे उत्पादन होते. म्हणजेच एक गाठ पाच ते साडेपाच किंटल कापूस प्रक्रिया केल्यानंतर तयार होते. कापूस विक्री पेक्षा त्यावरती प्रक्रिया करून दोन पैसे अधिकचे मिळून देण्याचा प्रयत्न व कापसाचा ब्रँड तयार करणे व कापूस मूल्य साखळीचा विकास करणे या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. यामधून तो साध्य केला जात आहे. स्मार्ट कॉटन प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी स्मार्ट कॉटन प्रकल्प पुणे प्रकल्प अंमलबजावणी कक्षातील कृषि व्यवसाय व मुल्य साखळी तज्ञ डी. आर भडीकर व कापुस मूल्य साखळी तज्ञ विक्रमसिंह निंबाळकर यांचा राजे शिवछत्रपती या जिनिंगला नुकताच पाहणी दौरा संपन्न झाला. यावेळी त्यांनी अजून गाठी बनवण्यासाठी मार्गदर्शन केले. यावेळी तालुका कृषि अधिकारी अभयकुमार वडकुते, जिल्हा नोडल अधिकारी बी.एस नितनवरे, जिल्ह्यातील कापुस मूल्य साखळी तज्ञ अश्वमेघ कथले, गटप्रमुख शिवनाथ फुलझळके, विकास दरेकर, राम फुलझळके मंडळ कृषि अधिकारी राजेंद्र सांगळे, सतीश केसभट, काकासाहेब पंडित, आश्विनी मस्के, मल्टी टास्किंग ग्रेडर बी. आर मोहोळकर, सोमवंशी, कृषि पर्यवेक्षक आर. आर चव्हाण, एस देशमुख, एस.एस पवार, कृषि सहाय्यक एम.आय शेख, व्ही.बी सानप, आर.के मेहेत्रे, पी.के वाघमारे, के. के पवार, एस.व्ही पारखे, वंदना शिंदे, पल्लवी घुले, बीटीएम राहुल घोडके सह शेतकरी कर्मचारी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका कृषि अधिकारी कार्यालय गेवराई अधिनस्त सर्व कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

## आष्टी शहरात वाळूचे टिप्पर पकडले

**आष्टी –**शहरातून विनापरवाना सहा ब्रास वाळू वाहतूक करणारे टिप्पर (क्र. एम.एच.१६ सीसी ५७६९) पोलिसांनी ताब्यात घेतले. ३१ जानेवारी रोजी रात्री शहरातील हंबर्डे महाविद्यालसमोर रोडवर ही कारवाई झाली. याबाबत अंमलदार अशोक तांबे यांच्या फिर्यादीवरुन टिप्परचालक अमोल रावसाहेब कोठावळेविरुध्द आष्टी ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

## बीड रेल्वे मार्गाची तपासणी; रेल्वे सुरक्षा आयुक्तच येणार भेटीला

### खासदार सोनवणे यांच्याकडून रेल्वेला गती देण्याचे प्रयत्न

**बीड (प्रतिनिधी):** रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि सुविधांसाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा हे ३ ते ६ फेब्रुवारी २०२५ दरम्यान पुणे विभागातील विविध रेल्वे स्थानकांची तपासणी करणार आहेत. यात ते बीड रेल्वे स्थानक आणि तेथील सुविधांची देखील पाहणी करणार आहेत. खा. बजरंग सोनवणे हे लोकसभेचा निकाल लागल्याच्या पहिल्या दिवसांपासून रेल्वेला गती देण्यासाठी केंद्रस्तरावर पाठवुरावा करत आहेत.

अहिल्यानगर-परळी रेल्वेमार्गासाठी अनेक वर्षांपासून लढा सुरू आहे. अनेक लोकसभा निवडणूका देखील याच मुद्दयांवर झालेल्या असून या निवडणूकीत खा. बजरंग सोनवणे यांनी आपण रेल्वे कामाला गती देण्यासाठी कायम पाठपुरावा करू, असे आश्वासन दिले होते. यानंतर निवडणूकीचा निकाल लागला आणि खासदारपदी विराजमान झाल्यानंतर बजरंग सोनवणे यांनी पहिलीच बैठक रेल्वे विभागाची घेतली. यावेळी त्यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना रेल्वेच्या कामासाठी कालमर्यादा ठरवून दिली होती. त्यानूसार रेल्वेचे काम सुरू असून पहिल्या टप्प्यात अंमळनेर ते विघनवाडी आणि दुसऱ्या टप्प्यात विघनवाडी ते नवगण राजुरीपर्यंत रेल्वे धावली आहे. आता काहीच दिवसात नवगण राजुरी ते बीडपर्यंत रेल्वे धावणार आहे. दरम्यान, रेल्वे सुरक्षा आणि सुविधांसाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा हे स्वतः रेल्वे स्थानकांची तपासणी करणार आहेत. या दौऱ्यादरम्यान महत्त्वाचे टप्पे ठरवण्यात आले असून यात, दि.४ फेब्रुवारी २०२५: विगनवाडी ते राजुरी स्थानकांदरम्यानची तपासणी, ५ फेब्रुवारी २०२५: राजुरी ते बीड स्थानकांदरम्यानची तपासणी, ६ फेब्रुवारी २०२५ बीड येथून तपासणी पूर्ण करून सकाळी ७ वाजता सीएसएमटी येथे आगमन होणार आहे. खा. बजरंग सोनवणे यांनी रेल्वे प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करून बीड जिल्ह्यासाठी रेल्वे सुविधांच्या विकासाची मागणी केली आहे. या निरीक्षण दौऱ्यादरम्यान बीड स्थानकाच्या विकासासंदर्भात आवश्यक उपाययोजनांवर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. नागरिकांना उत्तम रेल्वे सुविधा मिळाव्यात, यासाठी खा. सोनवणे सातत्याने प्रयत्नशील आहेत.

## माजलगावमध्ये दर्जेदार सिनेमे होतात हे अभिमानास्पद - वीरेंद्र सोळंके

**माजलगाव (प्रतिनिधी):–**माजलगाव सारख्या ग्रामीण भागात एवढे दर्जेदार सिनेमे होतात ही खूप अभिमानाची गोष्ट आहे असे प्रतिपादन येथील लोक नेते सुंदरराव सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन वीरेंद्र सोळंके यांनी केले होते.

येथील भास्कर शिंदे यांनी निर्मिती केलेला प्रिय नदीस (डियर रिव्हर) या बहुचर्चित सिनेमाचा प्रीमियर शो शहरातील माँ वैष्णवी मंगल कार्यालय येथे शहरवासीयांच्या अग्रस्तव १०-२० च्या स्क्रिनवर व आधुनिक साऊंड सिस्टीममध्ये ठेवण्यात आला होता यावेळी लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विरेंद्र सोळंके, अभय होके पाटील, जगदीश साखरे, पत्रकार उमेश मोगरेकर, तुकाराम येवले, कमलेश जाब्रस, नानासाहेब घोडके, ॲड. संतोष कसबे, बाळासाहेब क्षीरसागर, रेखाताई अंबुरे व ईश्वर अप्पा खुरपे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विरेंद्र सोळंके म्हणाले, प्रिय नदीस सिनेमा पाहून खूप आनंद झाला आपल्या माजलगावच्या मातीत असे कलाकार आहेत हे मी या निमित्ताने पाहत आहे. हा सिनेमा माजलगाव सारख्या ग्रामीण भागात स्थानिक कलाकारांनी केला ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे आणखीन ही खुप छान सिनेमे तयार व्हावेत अशी अपेक्षाही ही त्यांनी या वेळी केली तर या चित्रपटाचे निर्माता भास्करनाना शिंदे यांनी मराठवाड्यातील विविध व नवनवीन विषय घेऊन आणि स्थानिक कलाकारांना संधी देऊन चित्रपट निर्मिती केली जाईल अशी ग्वाही या वेळी दिली. 'प्रिय नदीस' या चित्रपटाची निर्मिती भास्कर नाना शिंदे यांनी केली तर दिग्दर्शक विष्णू उगले. कथा पटकथा संवाद लेखक आर प्रकाश यांनी लिहले असुन या चित्रपटाचे डीओपी व संकलन अमर देवने यांनी केली आहे या प्रसंगी चित्रपटातील सर्व टेक्निशियन, कलाकार यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह आणि ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला या चित्रपटास शहरा सह परिसरातील सिनेरसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. सूत्र संचालन, कसबे यांनी तर आभार सुभाष कांबळे यांनी व्यक्त केले.



# कार्यकर्त्यांच्या प्रेमामुळे कधीच वाटलं नाही मी एकटी आहे

## जालन्यात ना.पंकजाताई मुंडे यांचा भाजप पदाधिकाऱ्यांशी संवाद

### एक हजार सदस्य नोंदणी करणाऱ्या कार्यकर्त्यांचा केला सन्मान





जालना (सरकार): लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जाण्यानंतर जबाबदारी वाढली, यात काम करत असतांना कार्यकर्त्यांचे एवढे प्रेम मिळाले की कधीच वाटलं नाही मी एकटी आहे, त्यामुळे माझ्यात आणि कार्यकर्त्यांत कधीच अंतर पडू देणार नाही असे भावोदगार राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे काढले.

ना.पंकजाताई मुंडे यांनी आज शहरातील भाजप संपर्क कार्यालयास भेट देऊन पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला त्यावेळी त्या बोलत होत्या. आ. संतोष दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, भास्कर दानवे, सुनील आर्दड, अवधूत खडके आदींसह पदाधिकारी, नगरसेवक,सर्व तालुक्याचे मंडलाध्यक्ष यावेळी उपस्थित होते.जिल्हयाच्या पालकमंत्री झाल्याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या स्वागताला प्रचंड गर्दी झाली होती, हा धागा पकडून बोलतांना त्या म्हणाल्या, गर्दी आणि मुंडे हे समीकरण जुनेच आहे. मुंडे साहेबांपासून आमचे जालना जिल्ह्याशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत. केंद्रीय मंत्री म्हणून चांगले काम करणारे रावसाहेब दानवे आणि मुंडे साहेब यांनी गावोगाव जाऊन कार्यकर्ता जोडला, पक्ष वाढवला. मुंडे साहेबांच्या जाण्यानंतर जबाबदारी वाढली तथापि काम करतांना कार्यकर्त्यांच्या प्रेमामुळे कधीच वाटल नाही मी एकटी आहे. जात धर्माच्या पलिकडे जाऊन काम करण्याचे संस्कार आमच्यावर आहेत. फंड मिळेल नाही मिळेल, एखादे काम होईल नाही होईल पण कार्यकर्त्यांमध्ये कधी अंतर पडू देणार नाही असं त्या म्हणाल्या. संघटन पर्व अंतर्गत एक हजार सदस्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा यावेळी ना. पंकजाताई मुंडे हस्ते सन्मान करण्यात आला.पक्षाचा प्रत्येक आदेश तंतोतत पाळा. प्रत्येकाने एक हजार सदस्य करावेत आणि विक्रमी नोंदणी करावी असं आवाहन त्यांनी केलं.

कार्यक्रमानंतर ना. पंकजाताईंनी लोकनेते मुंडे साहेब चौकातील मुंडे साहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. ना. पंकजाताई मुंडे यांनी छत्रपती संभाजीनगरकडे रवाना होण्यापूर्वी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी घुगे परिवाराच्या वतीने त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.आ.अर्जुन खोतकर, आ. हिकमत उढाण, संपर्क प्रमुख पंडित भुतेकर यावेळी उपस्थित होते.

# चंपावती महोत्सवातील चित्रकला, रांगोळी स्पर्धेत जिल्हाभरातून हजारो बाल कलाकारांचा उस्पुर्त सहभाग

## हजारो बाल कलाकारांनी रेखाटले खा.डॉ.श्रीकांत शिंदेचे आकर्षक चित्र

बीड (सरकार): महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये गतवर्षीप्रमाणे याही वर्षी दि. १ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी २०२४ यादरम्यान बीड शहरात आठ दिवसीय जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात आले असून काल दि. १ फेब्रुवारी रोजी २०२४ रोजी बीड जिल्ह्यातील १०३ शाळांमधून हजारो बाल कलाकारांनी चित्रकला आणि रांगोळी स्पर्धेत उस्पुर्त सहभाग नोंदवला.

चित्रकला स्पर्धेत वयोगट इयत्ता पाहिली ते तिसरी- फुलांची टोपली, वयोगट इयत्ता चौथी ते सहावी- राष्ट्रीय पक्षी मोर आणि वयोगट- इयत्ता सातवी ते दहावी मधील बाल कलाकारांना संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे यांचे चित्र काढण्यासाठी विषय दिले होते. कमालीची गोष्ट सर्व वयोगटातील बाल कलाकारांनी आकर्षक अशे चित्र काढून स्वतःच्या कलेचे दर्शन घडवले यादरम्यानच जिल्हाभरातील ७२ शाळांमध्ये समूह रांगोळी स्पर्धा पार पडली असून बाल कलाकारांनी एकत्रित येऊन शाळेच्या प्रांगणात माझ्या शाळेची ईमारत हा विषय घेऊन उभेउभ रांगोळी काढली. कौतुकाची गोष्ट म्हणजे बाल कलाकारांनी शाळेच्या प्रांगणात उभेउभ काढलेली शाळेच्या ईमारतीची रांगोळी पाहून शाळेचे संस्थाचालक, प्राचार्य तथा शिक्षक भावुक झाली कारण या रांगोळीतून विद्यार्थ्यांचे स्वतःच्या शाळेवर असलेले प्रेम दिसून आले. चित्रकला आणि रांगोळी स्पर्धा संपन्न होत असताना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिनभैय्या मुळूक स्वप्नील गलधर आणि चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे तथा अमोल गायकवाड, अनिकेत कांबळे, प्रबुद्ध कोरडे यांनी विविध शाळेत भेटी दिल्या. विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांचे अभिनंदन केले. बीडमध्ये संपन्न होत असलेल्या आठ दिवसीय जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकारंडकातील चित्रकला स्पर्धेत बीडच्या हजारो बाल कलाकारांनी संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे यांचे हुबेहूब आणि आकर्षक रेखाटल्याने खा. डॉ श्रीकांत शिंदे यांनी बीडमधील बाल कलाकारांचे कौतुक करत आभार मानले आहेत. याबरोबरच शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिनभैय्या मुळूक स्वप्नील गलधर यांनी देखील सर्व शाळांनी चित्रकला, आणि रांगोळी स्पर्धेत आपल्या कलेचा अविष्कार दाखवून खा. डॉ श्रीकांत शिंदे यांच्यावर आपल्या चित्रातून प्रेम व्यक्त केल्याबद्दल आभार मानले आहेत.



# सर्व घटकांना न्याय देणारा परिपूर्ण अर्थसंकल्प

## ना. पंकजाताई मुंडे यांनी केले केंद्रीय अर्थसंकल्पाचे स्वागत

मुंबई (सरकार): पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात देशातील शेतकरी, शेतमजूर, तरूण वर्ग, महिला अशा सर्व समावेशक घटकांचा विचार करण्यात आला आहे. हा अर्थसंकल्प सर्व सामान्य घटकांना न्याय देणारा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील नवीन भारताचा नवा नकाशा समोर ठेवणारा आहे अशी शब्दांत राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे.



अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेची घोषणा करण्यात आली आहे.सरकार ही योजना राज्यांसोबत चालवणार आहे. १.७ कोटी शेतकऱ्यांना मदत मिळणार आहे. याचा देशातील १०० जिल्ह्यांना फायदा होणार आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ५ लाख रुपयांचे पॅकेज, किसान क्रेडिट कार्डच्या कर्जाची मर्यादा आता ३ लाखांवरून ५ लाख रूपये करण्यात आली आहे. किसान क्रेडिट कार्ड द्वारे ७ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना सुलभ कर्ज सुविधा मिळणार आहे. सर्व जिल्हयामध्ये जिल्हा रूग्णालयात कॅन्सर डे केअर सेंटर, ३६ जीवरक्षक औषधी करमुक्त, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय यासाठी पाच लाख रुपयांपर्यंत कर्ज आदींसाठी यात तरतूद करण्यात आली आहे.

अर्थसंकल्पात नव्या करप्रणालीची घोषणा करण्यात आली आहे.त्यानुसार १२ लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त होणार आहे. त्याचसोबत पुढील सर्व टॅक्स स्लॅब्जमध्येही बदल केले असून त्यानुसार करदात्यांना भराव्या लागणाऱ्या करात सूट मिळाली आहे. त्यामुळे करदात्यांसाठी हा अर्थसंकल्प मोठा दिलासा देणारा आहे. या अर्थसंकल्पामुळे सामान्य माणसाची खर्च करण्याची क्षमता वाढेल. देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास दर वाढवणे, सर्वसमावेशक विकास सुनिश्चित करताना खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक वाढवणे, देशांतर्गत भावना उंचावणे आणि वाढत्या मध्यमवर्गाची खर्च क्षमता वाढवणे या अर्थसंकल्पाचे उद्दिष्ट असल्याचे ना. पंकजाताई यांनी सांगितले.

# स्वा.सावरकर महाविद्यालयात भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या कार्यावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

बीड (सरकार): भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वा.सावरकर महाविद्यालयामध्ये १३ आणि १४ फेब्रुवारी २०२५ रोजी भारतरत्न स्वर्गीय नानाजी देशमुख यांच्या ग्रामीण विकासाच्या कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या भारतरत्न नानाजी देशमुख नआर्किटेक ऑफ रुरल डेव्हलपमेंट इन इंडिया या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी दिली. सावरकर महाविद्यालयामध्ये येत्या १३ आणि १४ फेब्रुवारी २०२५ रोजी भारतरत्न नानाजी देशमुख अँन आर्किटेक ऑफ रुरल डेव्हलपमेंट इन इंडिया या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेमध्ये नानाजी देशमुख यांनी केलेल्या ग्रामीण विकासाच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात येणार आहे. उद्धाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी हे उपस्थित राहणार आहेत.


# शिक्षक बी.बी.घुमरे यांचा सेवापुर्ती समारंभ संपन्न

बीड (सरकार): येथील विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे गणित विषयाचे शिक्षक बी.बी.घुमरे हे दि.३१ जानेवारी २०२५ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचा शाळेच्या वतीने सेवागौरव सोहळा आयोजीत करण्यात आला होता.

विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पेठ बीड येथील सहशिक्षक बी.बी.घुमरे आणि वाघमारे एस.बी. हे दि.३१ जानेवारी २०२५ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचा सेवागौरव सोहळा नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.जाधव एम.सी. हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श शिक्षण संस्थेचे कार्यवाहक राऊत एम.ए., विनायक प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका किर्तीताई पांगारकर, विनाताई भोज, मोहनराव सिरसाट, मुख्याध्यापक प्रदिप जगताप, अभिषेक राऊत, धनवंत मस्के, सुधाकर तांदळे, रावसाहेब भोसले. आदि उपस्थित होते. यावेळी प्रथम मान्यवरांच्या हस्ते स्व.केशरकाकू क्षीरसागर व कर्मयोगी स्व.सोनाजीराव क्षीरसागर यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पन करण्यात आला. विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने सर्वश्री घुमरे, वाघमारे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. या प्रसंगी मान्यवरांनी दोन्ही सेवानिवृत्त शिक्षकांना पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.जाधव एम.सी. यांनी सर्वश्री घुमरे व वाघमारे यांनी केलेल्या कार्याची माहिती सांगितली. यावेळी उपमुख्याध्यापक रियाज बेग, पर्यवेक्षक सुहास अमरापुरकर, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रल्हाद नरवडे यांनी केले. शेवटी राजेंद्र गाडेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.



# संतोषी माता मंदिरात रामदेव बाबा संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त शुक्रवारी जम्मा जागरण



बीड (सरकार): श्री रामदेवबाबा यांच्या संजीवन समाधी सोहळा निमित्त जुना मोंढा भागातील दक्षिण मुखी हनुमान टेकडी संस्थान मधील रामदेव बाबा मंदिर येथे माघ सुदी दशमी विक्रम संवत २०८१, शुक्रवार दि. ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी श्री रामदेव बाबा सत्संग मंडळ बीड तर्फे जम्मा जागरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी होणाऱ्या संजीवन समाधी सोहळा निमित्त श्रीरामदेव बाबांच्या मूर्तीस महाअभिषेक करण्यात येणार असून रात्री साडे नऊ वाजल्यापासून जम्मा जागरण कार्यक्रमास सुरुवात होणार आहे. या कार्यक्रमात बीड शहरातील नामवंत अशा गायक, संगीतकार, बासरी वादक, भजनी मंडळी,महिला, पुरुष, तरुण भाविकभक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभणार आहे तसेच या जम्मा जागरण सोहळ्यात रामेश्वर व्यास, खुशालचंद पारीख, संतोष टवाणी, राजु सिक्ची, गोविंद बोरा, पवन गील, संजय बिराळे पुरुषोत्तम पारीख, ओमजी झंवर, अनिल गुप्ता, सुरेश बनसोडेसह भजनी मंडळ, महिला, पुरुष भाविकभक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार असून शुक्रवारी संपन्न होणाऱ्या श्रीरामदेव बाबा संजीवन समाधी उत्सवानिमित्त आयोजित जम्मा जागरण सोहळ्यास बीड शहरातील भाविकभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जन्मा जागरण सोहळ्याचे यजमान जवाहरलाल बोरा, प्रेमचंद बोरा, सचिन, महावीर, गौरव, सौरभ, यश, नेतल, कियान एवं बोरा परिवार यांच्यासह श्री रामदेव बाबा सत्संग मंडळ बीड, श्री दक्षिणमुखी हनुमान टेकडी संस्थान जुना मोंढा, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे सांस्कृतिक स्नेहसंमेलन

बीड (सरकार):श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे दिनांक ३१ जानेवारी २०२५ वार शुक्रवार या दिवशी स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि प्रतिमापूजनाने मान्यवरांच्या हस्ते झाली या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती श्रेया कदम मॅडम तसेच शाळेचे अध्यक्ष श्री पारगावकर सर ,श्रीमती स्नेहा पारगावकर ,मॅडम ,सचिव शेख पाशा सर ,उपमुख्याध्यापिका श्रीमती अनिता सूर्यवंशी मॅडम, लोळगे चंपावती महोत्सवाचे अध्यक्ष प्रतीक कांबळे सर, मोठ्या संख्येने पालक वर्ग विद्यार्थी आणि त्यांचे नातेवाईक इत्यादी उपस्थित होते सुरुवातीला गणेश वंदनाचे विद्यार्थ्यांनी साजरीकरण केले

या कार्यक्रमांमध्ये पूर्व प्राथमिक गटातील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत तसेच आज हे संडे आणि आई-वडिलावर आधारित गीतावर बहारदार नृत्य सादर केले. या गीतामध्ये प्रत्यक्ष आई-वडिलांनीही स्वतःचा सहभाग नोंदवला आणि उत्कृष्ट नृत्य सादर केले. प्राथमिक गटातील विद्यार्थ्यांनी भाऊ-बहीण, आजी आजोबा ,मैत्री यावर आधारित उत्कृष्ट नृत्य सादर केले. तसेच सहावी ते नववी गटातील विद्यार्थ्यांनी स्त्री भृण हत्या, अंधश्रद्धा निर्मूलन, तानाजी ,गरबा ,वंदे मातरम, जुने पुराने हिंदी गाणे, शिक्षणाचे महत्व ,इत्यादी गाण्यावर बहारदार नृत्य सादर केले. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे या कार्यक्रमासाठी मुंबई बोरिवली येथील श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथील प्राचार्या ,शिक्षणतज्ञ श्रीमती श्रेया कदम मँडम खूप व्यस्त असतानाही आवर्जून या कार्यक्रमासाठी हजर राहिल्या आणि सर्व शिक्षकांना आणि पालकांना त्यांनी खूप चांगल्या पद्धतीने मार्गदर्शन केले. त्यांचा परिचय शिक्षिका श्रीमती पूजा मॅडम यांनी दिला.



# आदर्श गणेशनगर'मध्ये रविवारपासून अखंड हरिनाम सप्ताह व संगीत भागवतकथा ज्ञानयज्ञ सोहळा

बीड (सरकार): बीड शहरातील संकल्प सिद्धी हनुमान नगर, आदर्श गणेश नगर, नगर रोड भागात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रविवार दिनांक २ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व संगीत भागवत कथा व ज्ञान यज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या संगीत भागवत कथेचे प्रवक्ते भागवताचार्य ह.भ.प. अविनाश महाराज ठोसर आहेत. सदर सप्ताह ह भ प सदाशिव महाराज झणझणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे.

सप्ताहात रविवार दि. २ फेब्रुवारी ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे यांचे कीर्तन, दि.३ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.सदाशिव महाराज झणझणे, दि. ४ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. अनिल महाराज महाकले, खर्डा, दि.५ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. रामचंद्र महाराज जगताप, बीड, दि. ६ फेब्रुवारी ह.भ.प. महंत आप्पा महाराज चौरे, सद्गुरु चंद्रशेखर बाबा संस्थान, चोंडी, दिनांक ७ फेब्रुवारी ह. भ.प. अर्जुन महाराज जाधव वेदांत आश्रम, अंकुशनगर महाकाळा, दि.८ फेब्रुवारी रोजी ह भ प कृष्णानंद महाराज मुंडे, संत भगवानबाबा व माऊली दादा संस्थान, खडकी होणार आहे. सप्ताहात रविवार दिनांक ९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० ते १.०० या वेळात ह.भ.प. हरिहर महाराज शास्त्री दिवेगावकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहेत. सप्ताहात दैनिक कार्यक्रम नियोजन प्रमाणे होणार असून दुपारी २.०० ते ५.०० या वेळात भागवताचार्य ह भ प अविनाश महाराज ठोसर यांची भागवत कथा होणार आहे. भागवत कथा संयोजक व महापंगत अन्नदाते इंजि. एन.बी. चौरे हे आहेत.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)